**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय**
**(माध्यमिक व उच्च माध्यमिक)**
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत,
डॉ.ॲनी बेझंट मार्ग, पुणे ४११ ००१
दूरध्वनी क्रमांक : 020 – 26121394/96
ईमेल: doesecondary1@gmail.com/ doehighersec@gmail.com

---

क्र. शिसंमा-२०२६/सेवाजेष्ठता/टि-४/ दिनांक :

## सुधारित पत्र

प्रति,

१. विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व),
२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प.(सर्व)
३. शिक्षण निरीक्षक,(पश्चिम/दक्षिण/उत्तर) बृन्मुंबई.

विषय : महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मध्ये नमुद शिक्षक संवर्गाच्या सेवाज्येष्ठतेबाबतच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याबाबत.

संदर्भः १) महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार-ब, दि. २५ मार्च २०२३, असाधारण क्रमांक ९९, शालेय शिक्षण विभाग, दि. २४ मार्च २०२३ अन्वये प्रसिद्ध केलेली अधिसूचना.
२) शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.३२०/टिएनटि-१ दि.२८.०१.२०२५
३) मा.उच्च न्यायालय मुंबई येथील रिट याचीका क्र.३८४५/२०२४ व इतर मधील आदेश दि.११.०२.२०२५.
४) शासनाचे पत्रक्र.संकीर्ण २०१६/प्र.क्र.३२०/टिएनटि-१ दि.२३.०१.२०२६.
५) श्री. मा. नागो गाणार, माजी आमदार शिक्षक आमदार यांचे दि.२७.०२.२०२६ चे निवेदन.
६) संचालनालयाचे पत्रक्र.शिसंमा-२०२६/सेवाजेष्ठता/टि-४/१७७८८६६ दि.१२.०३.२०२६

उपरोक्त संदर्भिय क्र.५ अन्वये श्री. मा. नागो गाणार, माजी आमदार शिक्षक आमदार यांचे दि.२७.०२.२०२६ चे निवेदन. सोबत जोडले आहे.

आपणांस कळविण्यात आले होते की, संचालनालयाचे संदर्भ क्र.६ अन्वये कार्यवाही करण्याबाबत कळविएयात आले होते. तरी पुनश्चः या सुधारित पत्राव्दारे आपणांस कळविण्यात येते की, शासन अधिसूचना दि.२४.०३.२०२३ अन्वये महाराष्ट्र खाजगी शाळांतील (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील अनुसुची “फ”, परिच्छेद २ मध्ये बदल करण्यात आलेला आहे. तसेच शासन निर्णय दि.२८.०१.२०२५ अन्वये महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ मध्ये नमुद शिक्षक संवर्गाची सेवाज्येष्ठता निश्चित करण्याबाबतच्या तरतुदींचे सविस्तर स्पष्टीकरण देण्यात आले आहे तसेच संदर्भ क्र.४ अन्वये शासनाचे पत्र दि.२७.०२.२०२६ अन्वये तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सेवाजेष्ठतेबाबत अधिसुचनेनुसार व शासन निर्णयानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
Mahesh Madhukar Palkar
Date: 24-03-2026
12:45:51

**(डॉ.महेश पालकर)**
शिक्षण संचालक
(माध्यमिक व उच्च माध्यमिक),
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत सविनय सादर-

मा.श्री. नागो गाणार, माजी शिक्षक आमदार राज्य कार्याध्यक्ष, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद, सी.पी ॲण्ड बेरार प्राथमिक शाळा परिसर, सिरसपेठ नागपूर-४४००२४ यांना संदर्भाधिन पत्रान्वये माहितीस्तव अग्रेषित.

**महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ मध्ये नमूद शिक्षक संवर्गाची सेवाज्येष्ठता निश्चित करण्याबाबतच्या तरतूदींचे सविस्तर स्पष्टीकरण.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण- २०१६/प्र.क्र.३२०/टिएनटि-१**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक: २८ जानेवारी, २०२५.

**वाचा :- १.** महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, १९७७.

**२.** महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ मधील नियम क्र. १२ व या नियमाशी संबंधित अनुसूची फ.

**३.** केंद्र शासनाचा बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ व या अधिनियमातील तरतूदीनुसार महाराष्ट्र शासनाने दि.११.१०.२०११ रोजी निर्गमित केलेले नियम.

**४.** शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक प्राशातु-१११२/(२५८/२०१२)/प्राशि-३, दिनांक १३.०२.२०१३

**५.** शासन परिपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, समक्रमांक दि.२४.०१.२०१७.

**६.** शासन परिपत्रक शालेय शिक्षण व क्रीडा विभाग समक्रमांक दि.१४.११.२०१७.

**७.** शासन परिपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग समक्रमांक दि.०३.०५.२०१९.

**८.** शासन पत्र, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग समक्रमांक दिनांक १९.१०.२०१९.

**९.** शासन अधिसूचना शालेय शिक्षण व क्रीडा विभाग दिनांक २४.०३.२०२३.

**-:शासन परिपत्रक:-**

**पार्श्वभूमी: -**

संदर्भ क्र.१ येथील अधिनियमातील तरतूदीनुसार लागू करण्यात आलेल्या संदर्भ क्र.२ येथील नियमावलीतील नियम क्र.१२ व या नियमाशी संबंधित अनुसूची 'फ' मध्ये राज्यातील हा अधिनियम व नियमावली लागू असलेल्या शाळांतील मुख्याध्यापकासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सेवाज्येष्ठता निश्चित करण्याबाबतच्या तरतूदी विहीत करण्यात आल्या आहेत. संदर्भ क्र. ५ व ६ येथील शासन परिपत्रकान्वये या तरतूदीसंदर्भात काही नवीन सूचना निर्गमित करण्यात आल्या होत्या. संदर्भ क्र.७ अन्वये संदर्भ क्र. ५ व ६ येथील परिपत्रके अधिक्रमित करण्यात आली आहेत. संदर्भ क्र. ८ अन्वये उपरोक्त अनुसूची 'फ' मधील प्रवर्ग "क" मध्ये माध्यमिक शिक्षकांचा समावेश त्यांनी आवश्यक ती शैक्षणिक अर्हता धारण केल्याच्या दिनांकापासून करावा, अशी सूचना देण्यात आली आहे. संदर्भ क्र. ९ येथील अधिसूचनेन्वये उपरोक्त अनुसूची 'फ' मध्ये दुरुस्ती करुन काही नवीन

बाबींचा समावेश करण्यात आला. तसेच काही पूर्वीपासून लागू असलेल्या तरतूदींचे स्पष्टीकरण देण्यात आले आहे.

संदर्भ क्र. ९ येथील दिनांक २४.०३.२०२३ च्या अधिसूचनेतील तरतूदीमुळे शिक्षक संवर्गाच्या सेवाज्येष्ठतेच्या व परिणामी पदोन्नतीच्या अनुषंगाने संभ्रम निर्माण झाला आहे व तो योग्य त्या स्पष्टीकरणासह दूर करावा अशा आशयाची काही संघटनांची निवेदने शासनास प्राप्त झाली आहेत. याअनुषंगाने काही न्यायालयीन प्रकरणे देखील दाखल झाली आहेत.

संदर्भ क्र. ९ येथील अधिसूचना निर्गमित होण्यापूर्वी देखील काही तरतूदींबाबत स्पष्टीकरण देण्याची मागणी शासनाकडे सातत्याने करण्यात येत होती. त्यामुळे अनुसूची 'फ' मधील शिक्षक संवर्गाच्या सेवाज्येष्ठतेबाबत व संदर्भ क्र.९ येथील अधिसूचनेतील तरतुदींबाबत सविस्तर स्पष्टीकरण शासन खालीलप्रमाणे देत आहे.

**०२. स्पष्टीकरण:-**

**अ) प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा व उच्च माध्यमिक शाळा याबाबतचे स्पष्टीकरण:-**

महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ मधील अनुसूची 'फ' मधील सेवाज्येष्ठतेबाबतच्या तरतूदी प्राथमिक शाळांमधील तसेच माध्यमिक शाळा, कनिष्ठ अध्यापक महाविद्यालये आणि माध्यमिक विद्यालयांना व वरीष्ठ महाविद्यालयांना जोडलेल्या कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांबाबत स्वतंत्रपणे विहित करण्यात आल्या आहेत. त्यामुळे प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा व उच्च माध्यमिक शाळा म्हणजे काय, याचे स्पष्टीकरण खालीलप्रमाणे देण्यात येत आहे:-

(I) संदर्भ क्र. १ येथील अधिनियमातील नियम क्र.२ (१८) व २ (१९) अन्वये अनुक्रमे प्राथमिक शिक्षण व प्राथमिक शाळा यांची व्याख्या खालीलप्रमाणे स्पष्ट करण्यात आली आहे.

(i) "प्राथमिक शिक्षण":- शासन वेळोवेळी निश्चित करेल अशा विषयांचे व अशा इयत्तांपर्यंत प्राथमिक अथवा माध्यमिक शाळेतून दिले जाणारे शिक्षण म्हणजे प्राथमिक शिक्षण होय.

(ii) "प्राथमिक शाळा":- प्राथमिक शाळा म्हणजे अशी मान्यताप्राप्त शाळा अथवा मान्यताप्राप्त शाळेचा असा भाग ज्यात प्राथमिक शिक्षण दिले जाते.

(II) संदर्भ क्र.३ येथे नमूद बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ नुसार इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंतचे अथवा त्यापैकी कोणत्याही इयत्तेपर्यंतचे शिक्षण प्राथमिक शिक्षण ठरविण्यात आले आहे. त्यामुळे आपोआपच इयत्ता ९ वी व १० वी चे शिक्षण हे माध्यमिक शिक्षण ठरते. सदर अधिनियम दि.०१.०४.२०१० रोजी अंमलात आलेला आहे.

(III) संदर्भ क्र.४ येथील शासन निर्णयांन्वये इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंतचे अथवा त्यापैकी कोणत्याही इयत्तेपर्यंतचे शिक्षण हे प्राथमिक शिक्षण व इयत्ता ९ वी व इयत्ता १० वी चे शिक्षण स्पष्टपणे माध्यमिक शिक्षण म्हणून ठरविण्यात आलेले आहे. या शासन निर्णयातील प्रस्तावनेचे अवलोकन केले असता संदर्भ क्र.३ येथील अधिनियम लागू होण्यापूर्वी शैक्षणिक स्तरांबाबत जी व्यवस्था अंमलात होती त्याचे सविस्तर विवेचन करण्यात आले आहे. त्यानुसार इयत्ता १ ली ते ७ वी पर्यंतचे शिक्षण हे प्राथमिक शिक्षण असल्याचे स्पष्ट होते.

(IV) संदर्भ क्र.३ येथील अधिनियम दि.०१.०४.२०१० रोजी अंमलात आलेला आहे. तत्पूर्वी शैक्षणिक स्तरांबाबत जी व्यवस्था अंमलात होती, त्यानुसार इयत्ता ८ वी ते १० वी पर्यंतचे शिक्षण देणाऱ्या शाळा या माध्यमिक शाळा म्हणून गणल्या जात असत. यासंदर्भात शासन स्तरावरुन शाळांस मान्यता देण्याबाबतचे जे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत, त्याचे अवलोकन केले असता, माध्यमिक शाळा म्हणून एखाद्या शाळेस मान्यता देण्यासाठी इयत्ता ८ वी च्या वर्गास मान्यता देण्यात येत असे.

(V) संदर्भ क्र. ३ येथील अधिनियम अंमलात येण्याच्या दिनांकापूर्वी म्हणजे दि.३१.०३.२०१० पर्यंत एखादा आवश्यक अर्हता धारण करणारा शिक्षक इयत्ता ८ वीच्या वर्गाकरीता रितसर नियुक्त झाला असल्यास अशा शिक्षकास माध्यमिक शिक्षक म्हणून गणता येईल. तथापि, दि.०१.०४.२०१० व त्यानंतर जे शिक्षक इयत्ता ९ वी व १० वी करीता रितसर नियुक्त झाले असतील, अशा शिक्षकांना माध्यमिक शिक्षक म्हणून गणले जाईल.

(VI) एखादी शाळा संयुक्त शाळा असल्यास म्हणजे ज्यात वर उल्लेख केल्याप्रमाणे प्राथमिक शिक्षण व माध्यमिक शिक्षण दिले जात असल्यास अशा शाळेचा जो भाग प्राथमिक शिक्षण देतो त्यास प्राथमिक शाळा व जो भाग माध्यमिक शिक्षण देतो त्यास माध्यमिक शाळा गणणे आवश्यक आहे.

(VII) इयत्ता १ ली ते ७ वी पर्यंतचे शिक्षण देणाऱ्या शाळांना माध्यमिक शाळा म्हणून मान्यता नाही. त्यामुळे अशा शाळा अथवा संयुक्त शाळेचा जो भाग असे शिक्षण देतो ती शाळा म्हणजे प्राथमिक शाळा होय.

(VIII) इयत्ता ११ वी व १२ वी या वर्गांचे शिक्षण देणाऱ्या शाळा (कनिष्ठ महाविद्यालये) या पूर्वीपासूनच उच्च माध्यमिक शाळा म्हणून मान्यताप्राप्त आहेत.

**ब) <u>महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ मधील नियम क्र. १२ व या नियमाशी संबंधित अनुसूची 'फ' मधील तरतूदींबाबत खुलासा:-</u>**

(I) अनुसूची 'फ' मधील नियम क्र.१ अन्वये प्राथमिक शाळांमधील शिक्षकांची सेवाज्येष्ठता निश्चित करण्याबाबतची तरतूद विहीत करण्यात आली आहे. या

नियमाचा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षकांच्या सेवाज्येष्ठतेशी कोणताही संबंध नाही. या नियमानुसार प्राथमिक शाळांमधील शिक्षकांची सेवाज्येष्ठता त्याने या पदासाठी विहीत करण्यात आलेली शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण केल्याच्या दिनांकापासून ग्राह्य धरणे आवश्यक आहे. याचाच अर्थ नियुक्तीच्या वेळी संबंधित शिक्षकाने आवश्यक अर्हता धारण केली असल्यास त्याची सेवाजेष्ठता सेवेत रुजू होण्याच्या दिनांकास निश्चित करावी लागेल. प्राथमिक शिक्षकाने विहीत केलेल्या आवश्यक अर्हतेपेक्षा अधिकची अर्हता धारण केली असल्यास अशा अर्हतेचा सेवाज्येष्ठतेसाठी विचार करता येणार नाही. अशी अर्हता केवळ एक अतिरिक्त अर्हता समजण्यात यावी. प्राथमिक शाळेतील शिक्षक अशा सेवाज्येष्ठतेच्या आधारे त्या प्राथमिक शाळेत मुख्याध्यापकाचे पद मंजूर असल्यास 'मुख्याध्यापक, प्राथमिक शाळा' या पदावर पदोन्नतीसाठी पात्र असतील.

(II)(i) अनुसूची 'फ'मधील नियम क्र.२ हा माध्यमिक शाळा, अध्यापक विद्यालये व माध्यमिक शाळांशी तसेच वरिष्ठ महाविद्यालयांशी संलग्नित कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांची सेवाज्येष्ठता निश्चित करण्याशी संबंधित आहे. इंग्रजीत हा नियम खालीलप्रमाणे आहे.

Guidelines for fixation of seniority of teachers in the Secondary Schools, Junior Colleges of Education and Junior College classes attached to Secondary Schools and Senior Colleges.

(ii) माध्यमिक विद्यालये, अध्यापक विद्यालये व कनिष्ठ महाविद्यालये (उच्च माध्यमिक शाळा) यामध्ये कार्यरत शिक्षकांची सेवाज्येष्ठता या नियमानुसार निश्चित करावयाची आहे. अर्थात सेवाज्येष्ठता यादीत समावेश होण्यासाठी संबंधित शिक्षक माध्यमिक विद्यालय, अध्यापक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय यात कार्यरत असला पाहिजे म्हणजेच त्याची अशा संस्थामध्ये रितसर नियुक्ती होणे आवश्यक आहे. केवळ या संस्थामध्ये नियुक्त होण्यासाठी आवश्यक असलेली अर्हता धारण करणे पुरेसे नसून प्रत्यक्षात माध्यमिक विद्यालये, अध्यापक विद्यालये व कनिष्ठ महाविद्यालये (उच्च माध्यमिक शाळा) अशा संस्थामध्ये नियुक्ती होणे व कार्यरत राहणे क्रमप्राप्त आहे. हा सर्वसाधारण प्रस्थापित नियम असून यासाठी वेगळ्याने स्पष्टीकरणाची आवश्यकता नाही.

(iii) संदर्भ क्र.१ येथील अधिनियम व संदर्भ क्र.२ येथील नियमावली लागू होऊन साधारणपणे ४५ वर्षाहून अधिक कालावधी लोटला आहे. त्यावेळी आवश्यक शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण करणारे उमेदवार उपलब्ध होत नसल्याने संस्था व्यवस्थापनाकडून अशा संस्थामध्ये निरनिराळ्या अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांची शिक्षक म्हणून नियुक्ती होत असे. त्यावेळी माध्यमिक विद्यालये,

अध्यापक विद्यालये व कनिष्ठ महाविद्यालये (उच्च माध्यमिक शाळा) या संस्थामध्ये कार्यरत शिक्षकांच्या अर्हता विचारात घेऊन अनुसूची 'फ' च्या उपरोक्त नियम क्र.२ मध्ये अ,ब,क,ड,इ,फ,ग व ह असे प्रवर्ग विहीत करण्यात आले.

(iv) अनुसूची 'फ' मधील नियम क्र.२ मधील तळटीप ४ नुसार उपरोक्त प्रवर्ग हे सेवाज्येष्ठतेची शिडी असून ते उतरत्या क्रमाने दर्शविण्यात आले आहेत. म्हणजेच कनिष्ठ प्रवर्गातून वरिष्ठ प्रवर्गात त्या विशिष्ट वरिष्ठ प्रवर्गाची अर्हता धारण केल्यानंतर प्रवेश करता येतो व त्यानुसार सेवाज्येष्ठता निश्चित होते.

(v) शिक्षकाने कनिष्ठ प्रवर्गातून वाढीव अर्हतेमुळे वरिष्ठ प्रवर्गात प्रवेश केल्यास मूळ पदावरील रुजू दिनांकानुसार नव्हे तर वरिष्ठ प्रवर्गात प्रवेश केल्याच्या दिनांकापासून त्या शिक्षकांची त्या वरिष्ठ प्रवर्गातील सेवाज्येष्ठता निश्चित होते. अशा आशयाचे अनेक न्यायनिर्णय मा. उच्च न्यायालयाने पारित केले आहेत. त्यामुळे संदर्भ क्र.८ अन्वये शासनाने निर्गमित केलेली सूचना यथोचित आहे.यासाठी अनुसूची 'फ' मधील नियम क्र.२ खालील तळटीप ३ कडे लक्ष वेधण्यात येत आहे. यानुसार एकाच समान प्रवर्गात नियुक्त शिक्षकांचा नियुक्तीचा दिनांक समान असल्यास जो शिक्षक वयाने अधिक असेल तो सेवाज्येष्ठ मानला जाईल. यावरुन सेवाज्येष्ठता ही प्रवर्गनिहाय व प्रवर्गात प्रवेश केल्याच्या दिनांकापासून निश्चित करावयाची आहे ही बाब स्पष्ट होते.

(vi) उपरोक्त प्रवर्गापैकी ड, इ, फ, ग व ह या प्रवर्गात नमूद अर्हताधारकांची नियुक्ती मागील अनेक वर्षापासून माध्यमिक विद्यालये, अध्यापक विद्यालये व कनिष्ठ महाविद्यालये (उच्च माध्यमिक शाळा) या संस्थामध्ये शिक्षक म्हणून होत नसल्याने वस्तुत: हे प्रवर्ग आता कालबाह्य झाले आहेत. त्यामुळे आता केवळ प्रवर्ग अ,ब व क हे विचारात घेण्याची आवश्यकता आहे.

**(क) <u>माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक म्हणून पदोन्नतीने नियुक्तीसाठी स्पष्टीकरण:-</u>**

(i) माध्यमिक विद्यालये, अध्यापक विद्यालये व कनिष्ठ महाविद्यालये (उच्च माध्यमिक शाळा) या संस्थामध्ये रितसर नियुक्त होऊन कार्यरत असणारे "क" प्रवर्गातील शिक्षक "ब" प्रवर्गात व "ब" प्रवर्गातील शिक्षक "अ" प्रवर्गात सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नतीने नियुक्त होण्यास पात्र असले तरी पदोन्नतीसाठी केवळ सेवाज्येष्ठता हा एकमेव निकष लागू नाही. सेवाज्येष्ठतेबरोबरच पदोन्नतीच्या पदासाठी आवश्यक अर्हता देखील संबंधित उमेदवाराने धारण करणे आवश्यक आहे. याअनुषंगाने महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली,१९८१ मधील नियम क्र.३ (१) (ब) कडे लक्ष वेधण्यात येत आहे. सदर तरतुद खालीलप्रमाणे आहे:-

रात्रशाळेसह कोणत्याही माध्यमिक शाळेचा किंवा कनिष्ठ अध्यापक विद्यालयाचा मुख्याध्यापक/प्राचार्य म्हणून नेमणूक करावयाची व्यक्ती ही, पदवीधर असण्यासोबतच (शैक्षणिक अर्हता) सांविधिक (Statutory) विद्यापीठाची अध्यापनातील किंवा शिक्षणशास्त्रातील स्नातक पदवी किंवा शासनाने समतुल्य म्हणून मान्यता दिलेली अन्य अर्हता धारण करणारी (व्यावसायिक अर्हता) आणि पदवी (शैक्षणिक अर्हता) मिळवल्यानंतर एखाद्या माध्यमिक शाळेत किंवा कनिष्ठ अध्यापक विद्यालयात पूर्ण वेळ शिकविण्याचा एकूण किमान पाच वर्षाचा अनुभव असलेली असेल तसेच त्यापैकी किमान दोन वर्षाचा अनुभव हा अध्यापनातील किंवा शिक्षणशास्त्रातील स्नातक पदवी (व्यावसायिक अर्हता ) मिळवल्यानंतर असावा लागेल;

(ii) यावरुन असे स्पष्ट होते की, माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापक पदावर पदोन्नती होण्यासाठी संबंधित उमेदवाराने सेवाज्येष्ठतेबरोबरच माध्यमिक शाळेचा शिक्षक म्हणून ५ वर्षे काम करण्याची अर्हता धारण केली असली पाहिजे.

**(ड) संदर्भ क्र.९ येथील दिनांक २४.०३.२०२३ रोजीच्या अधिसूचनेतील तरतूदीबाबत खुलासा:-**

(I) दिनांक २४.०३.२०२३ रोजीच्या अधिसूचनेन्वये अनुसूची फ मधील नियम क्र.२ अंतर्गत असलेल्या प्रवर्ग क मध्ये काही सुधारणा करण्यात आल्या आहेत व तळटीप १ अन्वये संदिग्ध वाटणाऱ्या मुद्दयाचे स्पष्टीकरण देण्यात आले आहे

(II) दिनांक २४.०३.२०२३ रोजीची अधिसूचना निर्गमित होण्यापूर्वीची स्थिती व निर्गमित झाल्यानंतरची स्थिती याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे देण्यात येत आहे. तसेच ज्या दुरुस्त्या करण्यात आल्या आहेत त्याचे कारण देखील देण्यात येत आहे.

**प्रवर्ग क**

| अ.क्र. | दिनांक २४.०३.२०२३ पूर्वीची स्थिती | दिनांक २४.०३.२०२३ रोजीच्या अधिसूचनेने करण्यात आलेली दुरुस्ती | शेरा / कारण |
|---|---|---|---|
| १ | --- | Master’s degree in Social Science/ Humanities/Science/Maths/ Language (with 50% marks), M.Ed (with 50% marks)/ M.A (Education) (with 50% marks) (in in accordance with the changes made by National Council for Teacher Education from time to time.) | गणित, भाषा, विज्ञान, समाजशास्त्रे यासारख्या विषयांसाठी अधिक उच्च अर्हताधारक तज्ञ शिक्षक राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेने वेळोवेळी निश्चित केलेल्या मानकांनुसार नियुक्त करावे लागतील.<br>अशा अर्हताधारक उमेदवारांची माध्यमिक शिक्षक पदावर नियुक्ती |

| अ.क्र. | दिनांक २४.०३.२०२३ पूर्वीची स्थिती | दिनांक २४.०३.२०२३ रोजीच्या अधिसूचनेने करण्यात आलेली दुरुस्ती | शेरा / कारण |
|---|---|---|---|
| | | | झाल्यास त्यांचा प्रवर्ग क मध्ये समावेश होईल व समावेश झाल्याच्या दिनांकापासून त्याची सेवाज्येष्ठता गृहीत धरण्यात येईल. त्याचा सध्या कार्यरत शिक्षकांच्या सेवाज्येष्ठतेवर कोणताही परिणाम होणार नाही. |
| २ | M.A./M.Sc./M.Com., B.T./ B.Ed., or its equivalent; or | M.A/M.Sc./M.Com., B.T./ B.Ed., or its equivalent | कोणताही बदल करण्यात आला नाही. |
| ३ | B.A./B.Sc./B.Com.,B. T/B.Ed., or its equivalent; or | B.A/B.Sc./B.Com., B.T./B.Ed.,or its equivalent | कोणताही बदल करण्यात आला नाही. |
| ४ | B.A./B.Sc./B.Com. Dip. T. (old two years course); or | B.A/B.Sc./B.Com., Dip.T. (old two years course/D.Ed. (old two years Course); | D.Ed. (old two years Course) ही अर्हता नव्याने समाविष्ट करण्यात आली आहे. याच अनुषंगाने बहुतांशी आक्षेप प्राप्त झाले असून न्यायालयीन प्रकरणे देखील दाखल झाली आहेत.त्यामुळे याचा सविस्तर ऊहापोह या तक्त्याखाली स्वतंत्रपणे करण्यात आला आहे. |
| ५ | B.A./B.Sc./B.Com., S.T.C. /Dip. Ed./Dip. T.(one year course) with 10 years post- S.T.C. etc.service. | B.A/B.Sc./B.Com., S.T.C./Dip.T. (one year's course) with ten years' Service); | Post-S.T.C हे शब्द वगळण्यात आले आहेत. एक वर्ष कालावधीची संबंधित अर्हता धारण केल्यानंतरच १० वर्षाची सेवा होणार असल्याने हे शब्द वगळण्यात आले आहेत. |
| ६ | B.A. or its equivalent plus Senior Hindi Shikshak Sanad with five years service; or Junior Hindi shikshak with ten years service after obtaining both academic and training qualifications. | B.A. or its equivalent Plus Senior Hindi shikshak Sanad with five years' service; or Junior Hindi Shikshak Sanad with ten years' service. | after obtaining both academic and training qualifications. हे शब्द वगळण्यात आले आहेत. याचे स्पष्टीकरण वरील अनुक्रमांक 5 प्रमाणेच आहे. |

| अ.क्र. | दिनांक २४.०३.२०२३ पूर्वीची स्थिती | दिनांक २४.०३.२०२३ रोजीच्या अधिसूचनेने करण्यात आलेली दुरुस्ती | शेरा / कारण |
|---|---|---|---|
| ७ | | For Physical Education Teachers.- cases where the condition of one Physical Teacher for every 250 students and subject wise minimum 50 percent workload of Physical Education is fulfilled- B.A./BSC/ B.Com., H.D.Ed./ B.P.Ed./B.Ed (Physical Education); | नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार क्रिडा शिक्षकांची नियमित नियुक्ती आवश्यक असल्याने ही तरतूद करण्यात आली आहे. |
| ८ | | For Art teacher B.A./BSC/ B.Com./B.Com /B.F.A./Diploma in G.D. Art with –A.M. certificate/A.M. Diploma/ Diploma in Art Education; | नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार कला शिक्षकांची नियमित नियुक्ती आवश्यक असल्याने ही तरतूद करण्यात आली आहे. |
| ९ | | B.A./BSC/B.Com./B.F.A/Diploma in G. D. Art, D.T.C./D.M./A.T.D., with ten years service. | |

**(इ) D.Ed अर्हता समाविष्ट करण्याबाबत स्पष्टीकरण:-**

**(i)** सदर अर्हता ही तळटीप २ नुसार प्रशिक्षित शिक्षकाची अर्हता ठरविण्यात आली आहे. Dip. T. (old two years course) ही समान स्वरुपाची अर्हता पूर्वीपासूनच असल्याने D.Ed.(old two years Course) ही अर्हता समाविष्ट केल्याने कोणताही बदल होत नाही.

**(ii)** या परिपत्रकात वारंवार उल्लेख करण्यात आल्याप्रमाणे माध्यमिक शिक्षक पदावर नियुक्ती झाल्याशिवाय अनुसूची 'फ' मधील नियम क्र.२ अंतर्गत समाविष्ट असलेल्या "अ" ते "ह" यापैंकी कोणत्याही प्रवर्गात कोणत्याही शिक्षकाचा समावेश होऊ शकत नाही. अनुसूची 'फ' च्या दुरुस्ती दिनांकास प्राथमिक शाळेत कार्यरत असलेल्या कोणत्याही शिक्षकास प्रवर्ग 'क' मध्ये दुरुस्तीमुळे आपोआप प्रवेश मिळेल, ही धारणा चूकीची आहे.

**(iii)** पदवीधर D.Ed प्राथमिक शिक्षक माध्यमिक शिक्षकापेक्षा सेवाज्येष्ठ होतील असा आक्षेप प्रामुख्याने नोंदवण्यात आला आहे. या आक्षेपाचे निराकरण श्री. **क्ष** व श्री.**य** या दोन शिक्षकांच्या उदाहरणासह खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

| बाब | श्री. क्ष | श्री. य |
|---|---|---|
| **अर्हता -** | B.Sc. D.Ed. | B.Sc. B.Ed. |
| **प्रथम नेमणूक** | प्राथमिक शिक्षक म्हणून दि.०१.०१.२०२० रोजी | माध्यमिक शिक्षक म्हणून दि.०१.०१.२०२२ रोजी |
| **सेवांतर्गत उच्च उच्च व्यावसायिक अर्हता** | B.Ed ही अर्हता धारण दि. ०१.०१.२०२२ रोजी | ---- |

| | | |
|---|---|---|
| **माध्यमिक शिक्षक म्हणून नियुक्ती** | दिनांक ०१.०१.२०२३ रोजी | ----- |
| **प्रवर्ग क मध्ये प्रवेश** | दिनांक ०१.०१.२०२३ रोजी (कारण माध्यमिक शिक्षक म्हणून नियुक्ती झाल्यानंतरच प्रवर्ग क मध्ये समावेश होईल.) | दिनांक ०१.०१.२०२२ रोजी |
| **पदोन्नतीसाठी आवश्यक अर्हता धारण** | दिनांक ०१.०१.२०२८ रोजी | दिनांक ०१.०१.२०२७ रोजी |

## तळटीप-१ मध्ये करण्यात आलेला बदल

| अ.क्र. | दिनांक २४.०३.२०२३ पूर्वीची स्थिती | दिनांक २४.०३.२०२३ रोजीच्या अधिसूचनेने करण्यात आलेली दुरुस्ती | शेरा / कारण |
|---|---|---|---|
| 1 | Note 1:- For the purpose of categories Categories C, D, and E teachers with S. T. C., T.D., Jr. P.T.C. Dip., T., Dip. Ed. (post SSC one year course) qualifications appointed on or after 1st October 1970 shall be Considered as untrained and their seniority shall be fixed in the F or G category of untrained teachers as the case may be. | Note 1A- The seniority list shall be Maintained category wise in which the teacher is appointed and holding the required educational qualification and professional qualification for the post.<br>Note 1 B - The teacher at the time of joining shall possess the required qualification for a trained teacher to be included in category C, D or E, as the case may be (higher secondary or secondary) His seniority in that category shall be decided on the date, he joined in the service of that category.<br>Note 1 C- The teacher in category F, G or H, while in service improves or acquires higher educational and professional qualification for a trained teacher as provided in categories C, D or E as the case may be, he shall be included in the respective category for trained teacher as per his newly acquired educational qualification and Professional qualification however his seniority in that respective category shall be decided on the date he acquired such qualification and not from | प्रवर्ग "अ" ते "ह" मध्ये नियुक्ती झाल्याशिवाय व पर्यायाने माध्यमिक शिक्षक पदावर नियुक्ती झाल्याशिवाय सेवाज्येष्ठता यादीत समावेश करता येणार नाही तसेच वरिष्ठ प्रवर्गात समावेश झाल्यानंतर त्या प्रवर्गातील सेवाज्येष्ठता ही त्या प्रवर्गात प्रवेश केल्याच्या दिनांकापासून गृहीत धरण्यात येईल व मूळ नियुक्तीच्या दिनांकापासून गृहीत धरता येणार नाही. ही वस्तुस्थिती स्पष्ट करण्यासाठी Note 1A, 1B, 1C, 1D या तळटिप समाविष्ठ करण्यात आल्या आहेत. |

| अ.क्र. | दिनांक २४.०३.२०२३ पूर्वीची स्थिती | दिनांक २४.०३.२०२३ रोजीच्या अधिसूचनेने करण्यात आलेली दुरुस्ती | शेरा / कारण |
|---|---|---|---|
| | | the date he is appointed in the service. His seniority will be placed after the existing teachers appointed in that Category. | |
| | | Note1 D- If a teacher from primary section ( standard 1 to 5) acquires or improves his educational qualification but not appointed in secondary or higher secondary classes, he cannot claim seniority in secondary or higher secondary seniority list. His higher educational qualification shall be treated as additional qualification only. | |

**(फ) संदर्भ क्र.९ येथील दिनांक २४.०३.२०२३ ची अधिसूचना पूर्वलक्षी प्रभावाने लागू राहील किंवा कसे, याबाबत स्पष्टीकरण:-**

**(i).** दि.२४.०३.२०२३ च्या अधिसूचनेन्वये प्रवर्ग "क" मध्ये अनुक्रमांक १ येथे जो बदल करण्यात आलेला आहे, त्याद्वारे विविध विषयातील तसेच शिक्षण शास्त्रातील पदव्युत्तर पदवीधारकांना या प्रवर्गात समाविष्ट करण्यात आलेले आहे. वस्तुत: असे माध्यमिक शिक्षक हे पदवीधर असतानाच प्रवर्ग "क" मध्ये समाविष्ट असतात. त्यामुळे पदव्युत्तर पदवी ही अर्हता केवळ एक अतिरिक्त अर्हता ठरते. त्याचप्रमाणे जर ते नव्याने नियुक्त झाले असतील तर त्यांची सेवाज्येष्ठता प्रवर्ग "क" मध्ये समाविष्ट होण्याच्या दिनांकास गणली जाईल.

**(ii).** डीएड दोन वर्ष जूना अभ्यासक्रम ही अर्हता प्रवर्ग "क" मध्ये प्रवेश करण्यासाठीची अर्हता ठरविण्यात आली असली तरी या अर्हतेच्या आधारावर एखादा प्राथमिक शिक्षक माध्यमिक शाळेसाठी नियुक्त होऊ शकत नाही व माध्यमिक शिक्षक म्हणून नियुक्त झाल्याशिवाय प्रवर्ग "क" मध्ये प्रत्यक्षात प्रवेश होणार नाही. त्यामुळे ही अर्हता समाविष्ट करण्याने अगोदरच कार्यरत असलेल्या माध्यमिक शिक्षकांच्या सेवाज्येष्ठतेवर कोणताही परिणाम होत नाही.

**(iii).** अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत एखाद्या शिक्षक असा असू शकतो ज्यांने डीएड ही अर्हता धारण केली आहे व माध्यमिक शिक्षक म्हणून त्याची नियुक्ती फार पूर्वी झाली आहे. अशा परिस्थितीत दिनांक २४.०३.२०२३ ची अधिसूचना पूर्वलक्षी प्रभावाने लागू असणार नाही. कारण प्रवर्ग "क" मध्ये नव्याने प्रवेश करणारा शिक्षक हा त्या प्रवर्गात अगोदरच कार्यरत असणाऱ्या शिक्षकांपेक्षा सेवाज्येष्ठ होऊ शकत नाही.

**(iv)** तळटिप- १- ए, १-बी, १ सी व १-डी या केवळ अस्तित्वात असलेल्या तरतूदी अधिक स्पष्ट करण्यासाठी समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे त्या पूर्वलक्षी प्रभावाने लागू होतील किंवा कसे, हा प्रश्न गैरलागू ठरतो.

**०३.** प्राथमिक शिक्षकांकरीता विहीत करण्यात आलेली अर्हता व वेतनश्रेणी तसेच सेवाज्येष्ठतेबाबत नियमामध्ये स्वतंत्रपणे करण्यात आलेली तरतूद विचारात घेता, प्राथमिक शिक्षकांकरीताची सेवाज्येष्ठता यादी स्वतंत्रपणे ठेवण्यात यावी.

**०४.** उपरोक्त संपूर्ण विवेचन विचारात घेऊन संदर्भ क्र.१ येथील अधिनियम व २ येथील नियम लागू असेल त्या शाळांतील शिक्षक संवर्गाची ज्येष्ठता निश्चित करण्याची खबरदारी संस्था व्यवस्थापनाने घेणे आवश्यक आहे. संदर्भ क्र.९ येथील अधिसूचनेतील तरतुदींचा चूकीचा अर्थ लावून ज्येष्ठता निश्चित करण्यात आली असेल व त्यानुसार पदोन्नती देण्यात आली असेल तर ती जेष्ठता तात्काळ सुधारित करण्यात यावी व पात्र व्यक्तीस पदोन्नती देण्यात यावी.

**०५.** सदर परिपत्रक सर्व संबंधितांच्या निर्देशनास आणण्याची जबाबदारी सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक तसेच सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) यांची असेल. या परिपत्रकात नमूद तरतुदींशी विसंगतपणे जेष्ठतानिश्चिती व पदोन्नती करण्यात आली असल्यास त्यास कोणत्याही परिस्थितीत मान्यता देण्यात येऊ नये.

**०६.** सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२५०१२८१३०६२६८०२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

TUSHAR VASANT MAHAJAN

Digitally signed by TUSHAR VASANT MAHAJAN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SCHOOL EDUCATION AND SPORTS DEPARTMENT, 2.5.4.20=19c6c23f510a80926e9b7ee5db235979452f3f9e8918118634069a6cc7a22b9f, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1A39CEF3C157B9EE6A2ABE5779ACF233682613F7B9C335D6BF4877267695CECA, cn=TUSHAR VASANT MAHAJAN
Date: 2025.01.28 13:07:58 +05'30'

**(तुषार महाजन)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. राज्यपाल महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मलबार हिल, मुंबई.
२) मा. सभापती/ उपसभापती महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३) मा. अध्यक्ष/उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४) मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५) मा मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
६) मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
७) मा. मंत्री, शालेय शिक्षण, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
८) मा. मंत्री, ग्रामविकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
९) मा. विधानसभा/विधानपरिषद सदस्य (सर्व)
१०) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
११) प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४) सर्व विभागीय आयुक्त.
१५) सर्व जिल्हाधिकारी.
१६) संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
१७) संचालक (प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.

१८) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.

१९) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.

२०) सर्व आयुक्त, महानगरपालिका

२१) सर्व मुख्याधिकारी, नगर पालिका,

२२) सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा परिषद.

२३) शिक्षण निरीक्षक/प्रशासन अधिकारी, सर्व महानगरपालिका/नगरपालिका

२४) निवडनस्ती- टिएनटि-१.

**महाराष्ट्र शासन**
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
दालन क्र. ४३९, चौथा मजला, विस्तार इमारत, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई.
**Email Id:** tnt1.sesd-mh@mah.gov.in

---

**क्रमांकः**- संकीर्ण २०१६/प्र.क्र. ३२० /टिएनटि-१ **दिनांक: २३** जानेवारी, २०२६

**प्रति,**

आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.

**विषय:- महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मध्ये नमूद शिक्षक संवर्गाच्या सेवाज्येष्ठतेबाबतच्या तरतूदींची अमलबजावणी करणेबाबत..**

**संदर्भ:** शासन परिपत्रक समक्रमांक , दि.२८.०१.२०२५.

महोदय,

उपरोक्त विषयांकित संदर्भीय शासन परिपत्रकान्वये महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवच्या शर्ती) नियमावली, १९८१ मधील अनूसूची "फ" मध्ये राज्यातील मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर संवर्गाच्या सेवाज्येष्ठतेबाबतच्या तरतूदी विहीत करण्यात आलेल्या आहेत. या सेवाज्येष्ठतेबाबतच्या तरतूदींच्या आधारे पदोन्नती देणेबाबतचे सविस्तर स्पष्टीकरण संदर्भीय शासन परिपत्रकान्वये करण्यात आलेले आहे. तथापि, याप्रमाणे अंमलबजावणी क्षेत्रीय कार्यालयांकडून होत नसल्याबाबतच्या तक्रारी शासनास प्राप्त होत आहेत. तरी नियमावली १९८१ मधील अनुसूची "फ" मधील तरतूदी व याबाबत संदर्भीय शासन परिपत्रकान्वये देण्यात आलेले स्पष्टीकरण यानुसार क्षेत्रीय कार्यालयाकडून अंमलबजावणी करण्यात येईल. याबाबत दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात याव्यात. तथापि, अशा प्रकारे संदर्भाधीन शासन परिपत्रकानुसार कार्यवाही होत नसल्याची तक्रार शासनास प्राप्त झाल्यास संबंधित अधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करणेत येईल, अशा सूचना आपल्या स्तरावरुन सर्व क्षेत्रीय सक्षम प्राधिकाऱ्यांना निर्गमित करण्यात याव्यात, ही विनंती.

आपला,

(मनोज भि. काळे)
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत माहितीस्तव तथा उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित,**

१. शिक्षण संचालक (प्राथमिक),महाराष्ट्र राज्य, पुणे
२. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
३. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
४. सर्व शिक्षणाधिकारी
५. निवडनस्ती-टिएनटि-१

TRUPTI SADANAND BA
Dig TRU BAI Dat 18:

2025:BHC-AS:7463-DB



**IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY**
**CIVIL APPELLATE JURISDICTION**

**WRIT PETITION NO. 3845 OF 2024**

Rajendra Vasantrao Sonawane & Anr. … Petitioners
versus
The State of Maharashtra & Ors. … Respondents

**WITH**
**INTERIM APPLICATION NO. 13799 OF 2024**
**IN**
**WRIT PETITION NO. 3845 OF 2024**

The Secretary,
Rayat Education Society … Applicant
versus
Rajendra Vasantrao Sonawane & Ors. … Respondents

**WITH**
**WRIT PETITION NO. 3908 OF 2024**

Ramnath Trimbak Gadakh & Anr. … Petitioners
versus
The State of Maharashtra & ors. … Respondents

**WITH**
**INTERIM APPLICATION NO.10083 OF 2024**
**IN**
**WRIT PETITION NO. 3908 OF 2024**

Ramrao Atmaram Bachhav & Ors. … Applicants

**IN THE MATTER BETWEEN**

Ramnath Trimbak Gadakh & Anr. … Petitioners
versus
State of Maharashtra & Ors. … Respondents



::: Uploaded on - 14/02/2025 ::: Downloaded on - 14/02/2025 19:40:35 :::

**WITH**
**INTERIM APPLICATION NO. 13802 OF 2024**
**IN**
**WRIT PETITION NO. 3908 OF 2024**

Nasik District Maratha Vidya
Prasarak Samaj, Nashii … Applicant
**IN THE MATTER BETWEEN**

Ramnath Trimbak Gadakh & Anr. … Petitioners
versus
The State of Maharashtra & Ors. … Respondents

**WITH**
**WRIT PETITION NO. 14063 OF 2024**

Pramod Pundalik Lavangale … Petitioner
versus
The State of Maharashtra & Ors. … Respondents

**WITH**
**WRIT PETITION NO. 11243 2023**

B.Ed. Niyukta Madyamik Shikshan
Sangh & Anr. … Petitioners
versus
The State of Maharashtra & Ors. … Respondents

**WITH**
**INTERIM APPLICATION NO. 1729 OF 2024**
**IN**
**WRIT PETITION NO. 11243 OF 2023**

Padvidhar D. Ed. Kala/ Krida /
Shikshak & Shikshaketar Sangh & Anr. … Applicants

**IN THE MATTER BETWEEN**
B.Ed Niyukta Madhyamik Shikshan
Sangh & Anr. … Petitioners



::: Uploaded on - 14/02/2025 ::: Downloaded on - 14/02/2025 19:40:35 :::

versus
State of Maharashtra & Ors. … Respondents

**WITH**
**INTERIM APPLICATION NO. 1728 OF 2024**
**IN**
**WRIT PETITION NO. 11243 OF 2023**

Maharashtra Madyamik D.Ed. Shikshak
Mahasangh … Applicant

**IN THE MATTER OF**

B.Ed.Niykta Madhyamik Shikshak
Sangh & Anr. … Petitioners
versus
The State of Maharashtra & Ors. … Respondents

**WITH**
**WRIT PETITION NO. 15371 OF 2024**

Sandip s/o. Trimbak Gosavi & Ors. … Petitioners
versus
The State of Maharashtra & Ors. … Respondents

**WITH**
**WRIT PETITION NO. 16786 OF 2023**

Lok Seva Mandal, Bhadrawati & Ors. … Petitioners
versus
State of Maharashtra & Ors. … Respondents

**WITH**
**WRIT PETITION NO. 13191 OF 2019**

Modern Education Society & Ors. … Petitioners
versus
Shyamkumar Mahadevrao Badnerkar
and Another … Respondents



::: Uploaded on - 14/02/2025 ::: Downloaded on - 14/02/2025 19:40:35 :::

----

Mr.A.G.Ambetkar with Mr.Deepak Pote for the Petitioners in WP No. 15371 of 2024.
Mr.Mihir Desai, Senior Advocate with Mr.Sachin Kadam for the Petitioners in WP No. 3845 of 2024.

Mr.Narendra Bandiwadekar, Senior Advocate with Mr.Sachin Kadam for the Petitioners in WP No. 3908 of 2024.

Mr.Mihir Desai, Senior Advocate with Mr.Sachin Kadam for the Petitioners in WP No. 11243 of 2023.

Mr.Sachin Kadam for the Petitioners in WP No. 14063 of 2024.

Mr.Milind Deshmukh with Mr.Onkar A. Wable and Mr.Swapnil Vighne for the Respondent -Management (Rayat Education Society).

Mr.R.S.Apte, Senior Advocate i/b. J.H.Oak for the Intervenor in IA No. 1728 of 2024.

Mr.Yatin Malvankar for the Intervenors in IA No. 10083 of 2024 and IA No. 1729 of 2024.

Mr.Ketan Dhavle for Respondent No.4 in WP No. 11243 of 2023.

Mr.Sachin Gite for Respondent No.4 in WP No. 3908 of 2024.

Mr.B.V.Samant, Addl.GP with Mr.V.M.Mali, Ms.T.J.Kapre, AGP for the Respondent -State in WP Nos. 3845 of 2024 and 3908 of 2024.

Mr.V.G.Badgujar, AGP for the Respondent -State in WP No. 15371 of 2024.

Mr.Pooja Joshi Deshpande, AGP for the Respondent -State in WP Nos. 14063 of 2024, 16786 of 2023 and 13191 of 2019.

----

**CORAM : RAVINDRA V. GHUGE &**
**ASHWIN D. BHOBE, JJ.**

**DATE : 11th February, 2025**



::: Uploaded on - 14/02/2025 ::: Downloaded on - 14/02/2025 19:40:35 :::

**P.C. :-**

1. On 29th January, 2025, while considering Interim Application No. 13799 of 2024 filed by the Rayat Education Society, we have passed the following order :

> *1. Shri Kumbhakoni, the learned Senior Advocate for the Applicant, has drawn our attention to the Interim Application filed by the education society for the purpose of seeking leave of this Court to proceed to appoint eligible candidates as Head Masters/Assistant Head Masters. The reason for taking out the Application is in the light of the order of this Court dated 20th March, 2024 passed in Writ Petition Nos. 3845 of 2024 and 3908 of 2024, wherein the Respondent Management was injuncted from making any promotion without the leave of the Court. In the said order, the State was directed to file an affidavit in reply.*
>
> *2. By an order dated 7th January, 2025 passed by this Court, the State was directed to file it's reply, on or before 24th January, 2025. The said reply is yet to be filed.*
>
> *3. The learned Addl.GP submits that the State is not required to enter an affidavit in reply in view of the changed circumstances pursuant to the order of this Court dated 7th January, 2025. The Government Circular dated 28th January, 2025 (12 pages), has been issued by the State Government and the learned Addl. GP is instructed to canvas that the said Circular deals with the controversy before this Court. The same is taken on record and marked as* ***<u>'X-1'</u>*** *for identification.*
>
> *4. This Court had called for an explanation*



::: Uploaded on - 14/02/2025 ::: Downloaded on - 14/02/2025 19:40:35 :::

*from the State Government as to whether the notification dated 24th March, 2023 would have prospective effect or could be implemented retrospectively, which would affect several candidates. The learned Addl.GP further submits that this Government Circular dated 28th January, 2025 will solve most of the problems. Since the Government Circular, **'X-1',** has been tendered, the direction to file an affidavit in reply is withdrawn, on the request of the learned Addl.GP, made on instructions.*

*5. Shri Kumbhakoni, Shri Desai and Shri Bandiwadekar, the learned Senior Advocates along with the other learned Advocates, submit that they need time to study this Government Circular, which is issued yesterday, on 28th January, 2025. They will have to consider the pros and cons and the circumstances which would undergo a change in view of the same.*

*6. Considering the above, we are listing this Application on **11th February, 2025** at **2.30 pm.**"*

2. Today, the learned Senior Advocates along with the learned Advocates representing the Petitioners as well as the Respondents, are ***ad-idem*** on a fresh senior list will be formalized in the light of the Government Circular dated 28th January, 2025 and the appointments would be made on the posts available strictly in terms of the newly formalized seniority list. All the learned Senior Advocates jointly submit that all these matters can now be disposed



::: Uploaded on - 14/02/2025 ::: Downloaded on - 14/02/2025 19:40:35 :::

off since the Rayat Education Society/ Other Educational Institutions have decided to formalize the senior list in the light of the said Circular.

3. Mr. Apte, the learned Senior Advocate, representing the Intervenor in Interim Application No. 1728 of 2024 in Writ Petition No. 11243 of 2023 and Mr.Malvankar, the learned Advocate, representing the Intervenors in Interim Application No. 10083 of 2024 in Writ Petition No. 3908 of 2024 and Interim Application No. 1729 of 2024 in Writ Petition No. 11243 of 2023, jointly submit that they may have a cause against the Government Circular dated 28th January, 2025.

4. In view of the above, **all these Petitions and the Interim Applications filed either by the Petitioners or the Respondents therein, are disposed off,** by consent of the parties, by recording that the Rayat Education Society/ Other Educational Institutions would be formalizing the seniority list in terms of the Government Circular dated 28th January, 2025 and thereafter, proceed to make appointments/promotions strictly in accordance with law.



::: Uploaded on - 14/02/2025 ::: Downloaded on - 14/02/2025 19:40:35 :::

5. Insofar as the Intervention Applications filed by the Intervenors are concerned, **the said Applications are disposed off** with liberty that, if these Intervenors, after the fresh seniority list is finalized, or even before that, have any grievance and avail of a remedy, as is permissible in law, all contentions are kept open.

**(ASHWIN D. BHOBE, J.)** **(RAVINDRA V. GHUGE, J.)**



::: Uploaded on - 14/02/2025 ::: Downloaded on - 14/02/2025 19:40:35 :::